ePaper

निवडणुका घेऊन दाखवाच! 'वज्रमूठ सभे'त उद्धव ठाकरे यांचे भाजपला आव्हान




| वर्ष - 7 | अंक - 6 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- असा न्यायाधीश होणे नाही!
- राष्ट्रवादीमागे पराभवाचे शुक्लकाष्ट?
- 'वज्रमूठ' सभेतून सरकारवर हल्लाबोल

www.mahaenews.com | मंगळवार दि. 2 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# कामगारांच्या नोंदणीसाठी पंचवीस रुपये ऐवजी नाममात्र एक रुपया शुल्क!

## राज्याचे कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांची माहिती

| पिंपरी-चिंचवड |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**देशातील आणि राज्यातील हे डब्बल इंजिन सरकार कामगारांच्या विकासासाठी अतिशय वेगवान पद्धतीने काम करत आहे. कामगारांना सर्व सेवा, सोयी-सुविधा आणि योजनांचा लाभ एकाच छताखाली घेता यावा यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कामगार भवनांची निर्मिती करण्याचा संकल्प केला आहे. या कामगार भवनात कामगार विभागाशी संबंधीत सर्व कार्यालये एकाच ठिकाणी असतील. तसेच, मागील काळात बांधकाम कामगारांच्या नोंदणीसाठी पंचवीस रुपये ऐवजी नाममात्र एक रुपया शुल्क आकारण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे अशी माहिती राज्याचे कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी दिली.**



आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ आणि अप्पर कामगार आयुक्त यांच्यातर्फे चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आयोजित कार्यक्रमात डॉ. खाडे बोलत होते.

यावेळी गुणवंत कामगारांचा व कामगार कल्याण मंडळाच्या विविध योजनांचा लाभ मिळालेले कामगार व त्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्यात आला. कामगार कल्याणकारी धोरणाची सुरुवातच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले श्रम मंत्री म्हणून काम करत असताना शेतमजूर, औद्योगिक कामगार, स्त्री कामगार यासाठी अनेक कायदे केले आहे. यात प्रामुख्याने शेतमजुरांना किमान मजुरी देणें, औद्योगिक कामगारांना पुरेसा पगार व पगारी सुरक्षा, कामगार संघटनेला मान्यता मिळवून देणें, वर्षातून कमीतकमी २४० दिवस काम करणाऱ्या कामगारांना कायम करवून घेणें, कामगारांना दिवसभरात केवळ ८ तासांचे काम, नोकरीत असताना जर कामगारांचा अपघात अथवा मृत्यू झाला तर मालकांकडून कामगाराला नुकसान भरपाई. स्त्री कामगारांसाठी स्त्रियांना कारखाना कायद्या अन्वये रात्री काम करण्यास बंदी घातली, स्त्रियांना प्रसूती काळात भर पगारी सुट्टी दिली, बारमाही कामगारांना आपल्या हक्काची भर पगारी सुट्टी दिली, सक्तीची तडजोड किंवा लवाद हे तत्व कामगारांच्या न्यायासाठी स्थापना केली आहे.

### कामगार हा उद्योग क्षेत्राचा कणा

डॉ. खाडे म्हणाले की, कामगार दिन साजरा करण्याची प्रेरणा १८८६ मध्ये अमेरिकेत झालेल्या कामगार आंदोलनाची असली तरी, याच काळात भारतात आणि खासकरून मुंबईत भारतीय कामगार चळवळीचे जनक रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांनी देखील कामगार चळवळ उभारून कामाचे तास आठ, रविवारची सुट्टी, कामगाराचे किमान वय अशा मागण्यांसाठी कामगारांमध्ये जागृती निर्माण करायला सुरुवात केली होती. त्यामुळे या जागतिक कामगार चळवळीत आपल्याही कामगारांचा सहभाग होता. कामगार हा उद्योग क्षेत्राचा कणा आहे. कामगारांच्या विश्वासावर व परिश्रमावर उद्योग विश्व आपली भरभराट करत आहे.

# राज्याच्या जडणघडणीमध्ये कष्टकरी, कामगारांचे मोठे योगदान

## कामगार नेते तथा शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद यांचे प्रतिपादन

| पिंपरी| महाईन्यूज |
प्रतिनिधी|

**राज्याच्या जडणघडणीमध्ये कष्टकरी, माथाडी कामगारांचे मोठे योगदान आहे. त्यांचा उत्कर्ष आणि विकासासाठी महाराष्ट्र मजदूर संघटना राज्य पातळीवर सकारात्मक कार्य करीत असून आज १ मे आंतरराष्ट्रीय कामगार दिन, कामगार चळवळींच्या गौरवासाठीचा महत्वाचा विशेष दिन आहे. आजवर कामगारांसाठी अनेक संघटनांनी भांडवलदरांशी लढा दिला.**

### महाराष्ट्र मजदूर संघटनेच्या वतीने कामगार दिनानिमित्त स्व. अण्णासाहेब पाटील यांना अभिवादन..!

या लढ्यातून अनेक कामगार चळवळी घडल्या. त्याचे फलित म्हणून कामगार संघटनांची निर्मिती झाली. आज देशभरात अनेक कामगार संघटना कामगारांचे प्रतिनिधित्व करत आहे. म्हणूनच औद्योगिक क्रांतीनंतरच्या काही कालखंडानंतर आज कामगारवर्ग स्थिरस्थावर झालेला दिसतोयं, असे प्रतिपादन कामगार नेते तथा शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद यांनी केले.

जागतिक कामगार दिनानिमित्त आज १ मे रोजी चिंचवडच्या केएसबी चौकात कामगार भूषण स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले. त्यावेळी इरफानभाई बोलत होते. यावेळी वाहनफेरी, मेळावे आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित कामगार संघटनांच्या प्रतिनिधींनी कामगार चळवळीतील कामगार नेत्यांच्या आठवणींना उजाळा दिला.



कार्यक्रमास महाराष्ट्र मजदूर संघटनेचे कार्याध्यक्ष परेश मोरे, भिवाजी वाटेकर, प्रविण जाधव, पांडुरंग कदम, पांडुरंग काळोखे, अप्पा कौदरे, सर्जेराव कचरे, सतीश कंठाळे, श्रीकांत मोरे, नागेश व्हनवटे, आशोक साळुंखे, शंकर मदने, बबन काळे, अमित पासलकर, ऊद्धव सरोदे, गोरक्षनाथ दुबाले, सुनिल सावळे, समर्थ नाईकवाडे, दादा कदम, विठ्ठल ईंगळे, ज्ञानदेव पाचपुते, सोमनाथ फुगे, चंद्रकांत पिंगट, चंदन वाघमारे, अक्षय शेलार, किशोर कोळेकर, कैलास तोडकर, रत्नाकर भोजने, ज्ञानदेव गवते, सखाराम हारगुले व संघटनेचे सर्व पदाधिकारी, मुकादम, व सभासद कामगार मोठ्या संख्यने उपस्थित होते.

# असा न्यायाधीश होणे नाही!

## » दिव्यांग व्यक्तीसाठी न्यायाधीश स्वत: उतरले कोर्टाची पायरी, काय घडलं?

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**रस्ते अपघातात मुलगा गमावलेल्या दिव्यांग पालकांना नुकसानभरपाई देण्या...'चे प्रकरण शिवाजीनगर जिल्हा आणि सत्र न्यायालयात आयोजित लोक अदालतीमध्ये निकाली काढण्यात आले. आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दिव्यांग पालक न्यायालयाची पायरी चढू शकत नसल्याने न्यायाधीश स्वत: इमारतीतून खाली उतरले आणि संबंधितांची आस्थेने चौकशी केली आणि प्रक्रिया मार्गी लावली.**

सन २०१६मध्ये मुलाचा अपघाती मृत्यू झाल्याने त्याच्या आई-वडिलांनी नुकसानभरपाईसाठी मोटार अपघात न्यायाधिकरणाकडे विमा कंपनीविरोधात अर्ज दाखल केला होता. हा अर्ज मंजूर करीत न्यायाधिकरणाने अर्जदार आई-वडिलांना १४ लाख ७० हजार १८० रुपयांची नुकसानभरपाई देण्याचा आदेश दिला. मात्र, विमा कंपनीने त्या आदेशाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात अपील दाखल केले. त्या अपिलावर सुनावणी करण्यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने विमा कंपनीला १८ लाख ३५ हजारांची रक्कम भरण्याचा आदेश दिले होता. दरम्यान, अर्जदार आणि विमा कंपनीत तडजोड होऊन अर्जदार आई-वडिलांनी १७ लाख ८५ हजार ५६१ रुपये रकमेवर तडजोड केली. रविवारी झालेल्या लोक अदालतीत प्रकरण तडजोड करून पूर्णत: संपविण्यात आले.



जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश सत्यनारायण आर. नावंदर यांच्यासमोर हे प्रकरण निकाली निघाले. दरम्यान, अर्जदार दिव्यांग असल्याने ते न्यायालयात दुसऱ्या मजल्यावर जाऊ शकत नव्हते. त्यामुळे नावंदर स्वतः दुसऱ्या मजल्यावरून खाली आले. त्यांनी अर्जदाराची स्वाक्षरी घेऊन तडजोडीचा आदेश दिला. विमा कंपनीच्या वतीने ॲड. हिरालाल बांठिया यांनी काम पाहिले. ॲड. जयश्री वाघचौरे यांनी नावंदर यांच्या पॅनेलसोबत काम करत मदत केली. दरम्यान, न्यायाधीश नावंदर यांनी अन्य काही प्रकरणांची प्रक्रिया त इमारतीतून खाली येऊन पूर्ण केली.

### कौटुंबिक न्यायालयात 30 दावे निकाली

» मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पुण्यातील कौटुंबिक न्यायालयात रविवार आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये कौटुंबिक स्वरुपाचे ३० दावे निकाली काढले. निकाली ३० दाव्यांमधील २६ जोडपी एकत्र नांदायला गेली. कौटुंबिक न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश हितेश के. गणात्रा, न्या. मनीषा काळे, न्या. हेमंत गायकवाड, न्या. संगीता पहाडे, न्या. राघवेंद्र आराध्ये, द फॅमिली कोर्ट लॉयर्स असोसिएशनच्या अध्यक्ष ॲड. वैशाली चांदणे, उपाध्यक्ष अजय डोंगरे, पॅनेल न्यायाधीश म्हणून वि. वा. शहापुरकर, दीपक जोशी, एस. जी. तांबे यांनी काम पाहिले.

> न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी दिव्यांग पक्षकारांना न्यायालयाच्या वरच्या मजल्यावरील सुनावणीला उपस्थित राहणे शक्य नसल्याने स्वत: न्या. सत्यनारायण आर. नावंदर इमारतीतून खाली आले. त्यांनी पक्षकारांची आस्थेने चौकशी केली आणि प्रक्रिया पूर्ण करण्यास मदत केली.
>
> - स्वप्नील शिंदे

# शेतकऱ्याचे बिबट्याशी दोन हात!

## » अचानक हल्ला पण जोरदार प्रतिकार, बिबट्याने ठोकली धूम

।मंचर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उसाच्या शेतात पाणी देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला केला. यामध्ये शेतकरी गंभीर जखमी झाला आहे. पारगाव शिंगवे येथे ही घटना घडली. शेतकऱ्यावर बिबट्याने हल्ला केल्याची घटना पारगाव शिंगवे येथे घडली आहे. सायंकाळी शेतात पाणी देण्यासाठी गेले असतांना घटना घडल्याचे समजते.**

राजाराम कोंडिबा थोरात (वय ६५) असे जखमीचे नाव असून, ते माजी सैनिक आहेत. थोरात शनिवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास उसाच्या शेतात पाणी देण्यासाठी गेले होते. त्या वेळी उसात दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात बिबट्या व थोरात यांच्यात झटापट झाली. बिबट्याने थोरात यांच्या दोन्ही हातांना व पायांना पंजा मारून गंभीर जखमी केले. थोरात यांनी जोरदार प्रतिकार केल्याने बिबट्याने तेथून पलायन केले. आरडाओरडा ऐकून नागरिक जमा झाले.

यानंतर थोरात यांना उपचारासाठी मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजीराव जाधव आणि डॉ. हनुमंत भवारी यांनी दिली.

बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वन विभागाने परिसरात पिंजरा लावावा, अशी मागणी सरपंच बबनराव ढोबळे व माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांनी केली आहे. यानंतर वन विभागाने रविवारी सायंकाळी सहा वाजता शेतात पिंजरा लावल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



### नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण

» वन विभागाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. गेल्या महिन्यात घटनास्थळाच्या जवळच एका शेतात मेंढपाळावर बिबट्याने हल्ला करून जखमी केले होते. यानंतर तेथील बिबट्याला वन विभागाने जेरबंद केले होते. मात्र, आता पुन्हा एकदा बिबट्याने हल्ला केल्याने या परिसरात आणखी बिबटे असल्याचे समोर आले आहे. बिबट्याच्या हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# खडकवासला धरण चौपाटीवर तुफान गर्दी

**किरकटवाडी** - महाराष्ट्र दिनानिमित्त असलेली सुट्टी व शाळांना लागलेली उन्हाळ्याची सुट्टी यांमुळे खडकवासला धरण परिसरात पर्यटकांची तुफान गर्दी झाली आहे. हजारो पर्यटक जीव धोक्यात घालून खडकवासला धरणाच्या पाण्यात उतरलेले दिसत असून सुरक्षेसंदर्भात प्रशासनाने कोणतीही उपाययोजना केलेली नाही. पर्यटकांच्या वाहनांमुळे खडकवासला धरण चौक परिसरात मोठी वाहतूक कोंडी झाली आहे.

चौपाटी परिसरात अस्ताव्यस्त वाहने उभी करुन हजारो पर्यटक खडकवासला धरणाच्या पाण्यात उतरलेले दिसत आहेत. धरणात उतरलेल्या पर्यटकांच्या वाहनांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. सलग आलेल्या सुट्ट्यांमुळे सिंहगड, पानशेत, वरसगाव या भागात गेलेले पर्यटक परतीच्या प्रवासाला निघालेले असल्याने त्यामुळेही वाहतूक कोंडीत मोठी भर पडत आहे. खडकवासला धरण चौकात हवेली पोलीस ठाण्याचे व जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करत आहेत मात्र बेशिस्त पर्यटकांमुळे त्यात अडथळा निर्माण होताना दिसत आहे.



## आत्मकेंद्री राजकारणामुळेच पिंपरी-चिंचवड

# राष्ट्रवादीमागे पराभवाचे शुक्लकाष्ठ?

### नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या काळात पराभवाची मालिका कायम

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**एकेकाळी पिंपरी-चिंचवड हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असताना गेल्या ९ वर्षांपासून निर्णायक विजयासाठी शहर राष्ट्रवादी चाचपडत असताना दिसत आहे. २०१७ ते २०२२ दरम्यान ३७ नगरसेवक असतानाही शहर आणि परिसरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी ‘बॅक फूट’ आहे. त्यामुळे स्थानिक पदाधिकारी आणि पक्षश्रेष्ठींना आत्मचिंतनाची आवश्यकता आहे.**







राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थापनेपासून पिंपरी-चिंचवड शहरात सलग २० वर्षे एकहाती सत्ता राखण्यात नेते अजित पवार यांना यश मिळाले होते. मात्र, २०१४, २०१९ अशी विधानसभा, लोकसभा आणि त्यापूर्वी पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला पराभवाचा सामना करावा लागला. राष्ट्रवादीला विरोधी बाकावर बसावे लागले.

शहरात पुन्हा सत्ता प्रस्थापित करण्यासाठी अजित पवार यांनी नवोदित चेहऱ्यांना संधी दिली. अजित गव्हाणे, कविता आल्हाट, इम्रान शेख अशा तरुणांना महत्त्वाच्या जबबादाऱ्या देण्यात आल्या. मात्र, माजी महापौर संजोग वाघेरे, आझम पानसरे, योगेश बहल, माजी आमदार विलास लांडे यांच्यासह भाऊसाहेब भोईर यांच्यासारख्या प्रभावी नेत्यांना महत्त्वाच्या पदांवर संधी देता आली नाही. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात यापैकी काहींना राज्य पातळीवर जबाबदारी देता आली असती, मात्र, तसे न झाल्यामुळे केवळ “मार्गदर्शक” इतकीच ओळख या नेत्यांसमोर राहिली. त्याचा फटका राष्ट्रवादीला आतापर्यंत झालेल्या सर्व निवडणुकांमध्ये बसला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

**बाजार समिती निवडणुकीत लांडे, वाघेरे अलिप्त...**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकांमध्ये संपूर्ण राज्यात महाविकास आघाडी किंबहुना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा ‘डंका’ असताना मात्र, हवेली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत राष्ट्रवादीचा ‘सुपडा साप’ झाला. या निवडणुकीतून राष्ट्रवादीच्या पक्षश्रेष्ठींनी बोध घेणे अपेक्षित आहे. या निवडणुकीत नाती-गोती आणि पै-पाहुण्यांची उमेदवारांना मदत होते. माजी आमदार विलास लांडे यांचा शिरुर लोकसभा मतदार संघासह पिंपरी-चिंचवड आणि हवेली परिसरात मोठा गोतावळा आहे. हीच ताकद माजी महापौर संजोग वाघेरे यांच्याकडे होती. त्यांच्याकडे या निवडणुकीची जबाबदारी देणे अपेक्षित होते. मात्र, तसे झाले नाही. लांडे, वाघेरे या निवडणुकीपासून अलिप्त राहिले. याउलट, भाजपाच्या पक्षश्रेष्ठींनी महेश लांडगे यांच्याकडे जबाबदारी दिली. लांडगे यांनी नाती-गोती, पै-पाहुण्यांना आपल्या बाजुने केले आणि निवडणुकीत भाजपा पुरस्कृत अण्णासाहेब मगर शेतकरी विकास आघाडीला मदत झाली.

**चिंचवड पोटनिवडणुकीतून बोध घेतला नाही...**

शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्याकडे शहर राष्ट्रवादीची जबाबदारी सोपवल्यापासून ज्येष्ठ-कनिष्ठ असे दोन गट निर्माण झाले आहेत. त्याचा फटका आतापर्यंत झालेल्या सर्वच निवडणुकींमध्ये राष्ट्रवादीला बसला आहे. चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतही निवडणुकीचे प्रभावी दावेदार भाऊसाहेब भोईर असताना नाना काटे यांना उमेदवारी देण्यात आली.

भोईर यांच्यावर प्रचार प्रमुखाची जबाबदारी दिली असताना सर्वाधिकार मावळचे आमदार सुनील शेळके यांच्याकडे सोपवण्यात आले. परिणामी, राष्ट्रवादीत दोन गट निर्माण झाले. एका गटाने काटेंचे काम केले नाही. त्याचा फायदा भाजपाला झाला.

### बाजार समितीचा निकालाचे संकेत काय?

**बाजार समितीच्या निकाल म्हणजे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीची रंगीत तालीम मानली जाते. हवेली बाजार समितीचा विचार करता जिल्हा परिषदेत या निकालाचे पडसाद उमटणार असून, राष्ट्रवादीला वर्चस्व टिकवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागणार आहे. शिरुर आणि मावळ अशा दोन लोकसभा मतदार संघामध्ये पिंपरी-चिंचवड शहराची विभागणी झाली आहे. शिरुरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे बाजार समितीसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सक्रीय नाहीत. मावळात श्रीरंग बारणे यांनी शिंदे गटाच्या माध्यमातून भाजपाची वाट मोकळी केली आहे. चिंचवडमध्ये जगताप कुटुंबीय आणि भोसरी व पिंपरीमध्ये आमदार लांडगे यांनी जोरदार मशागत सुरू केली आहे. याउलट, राष्ट्रवादी केवळ अजित पवार येतील आणि काहीतरी चमत्कार करतील, या भरोशावर आहे. त्यामुळे आगामी महापालिका, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीची तयारी करताना ज्येष्ठ नेते माजी आमदार विलास लांडे यांच्यासारख्या “मास लीडर”ची शहर राष्ट्रवादीला आवश्यकता आहे. परंतु, आत्मकेंद्री राजकारणामुळे स्थानिक अतिमहत्त्वाकांक्षी नेत्यांनी लांडे यांना ‘मार्गदर्शक’रांगेत बसवून, राष्ट्रवादीला पराभवाच्या खाईत ढकलले आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकार नोंदवतात.**

---

# दिघी येथे सद्गुरु मोरेदादा यांच्या पुण्यतिथीनिमित्त रक्तदान शिबीर

### महाराष्ट्र दिनी परिसरातील 150 जणांचे रक्तदान, कै. हिराबाई लांडगे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विधायक उपक्रम

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी । प्रतिनिधी महाराष्ट्र दिन, कामगार दिनाचे औचित्य साधून रक्तदान सारखा विधायक उपक्रम दिघी येथे घेण्यात आला. श्री स्वामी समर्थ दिंडोरी प्रणित सेवा मार्गाद्वारे सद्गुरू परमपूज्य मोरेदादा यांच्या पुण्यतिथीनिमित्त व आमदार महेश लांडगे यांच्या मातोश्री कै. सौ. हिराबाई किसनराव लांडगे यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिघी मॅक्झिन सेवा केंद्रद्वारे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात १५० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले.**



या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी कामगार नेते सचिन लांडगे, शिवशंकर महाराज व्यवहारे, अमित पाटोळे, प्रतिक सोनवणे, मुकेश लोंढे, कानिफनाथ मंदिर चर्होली अध्यक्ष ॲड जालिंदर जोरे, संतोष तापकीर, श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचे मनोज काळे, आनंद फुले, श्रीनिवास साखरे, शिवाजी पवार, रोहित तापकीर, अमोल शिंदे, अनिल शिंदे, राजकुमार जाधव, शंकर पाटील, सागर वायकर, दादासाहेब साळुंखे, समाधान शिर्के, विजय भोसले, मुकुंदराज पाटील, शिरीष वाघुंडे, विलास हिवाळे, नवनाथ आरुडे, विलास केंद्रे, प्रशांत खलाणे, उदय फुलारी आधी उपस्थित होते.

### 150 हून अधिक रक्तदात्यांची रक्तदान सेवा

यावेळी कामगार नेते सचिन लांडगे, ॲड. जालिंदर जोरे यांनी या स्तुत्य उपक्रमाबद्दल दिंडोरी प्रणित मार्गाचे आभार व्यक्त केले आणि सदरचे उपक्रम भविष्यात सतत होत राहावे या सदिच्छा व्यक्त केल्या. आयोजकांना प्रोत्साहन दिले. या शिबिरामध्ये सुमारे १५० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान सेवा केली. तसेच, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील रक्तपेढीने सहकार्य केले.



## संपादकीय »

# गर्जा महाराष्ट्र माझा?

***महाराष्ट्र हे स्वतंत्र एकक कल्पिले तर जगात तेव्हा महाराष्ट्राचा क्रमांक पहिल्या दहा-पंधरात असेल. यातला पहिला टप्पा २०२७ मध्ये गाठायचा आहे. तो आहे एक लाख कोटी डॉलरचा. ही स्वप्ने छान आहेत. ती गाठली जातीलही. मग, आजचा महाराष्ट्र इतका अशांत, संघर्षशील, असमाधानी आणि त्रस्त का आहे?***

'महाराष्ट्र' या स्वतंत्र भारतातील मराठी भाषकांच्या राज्याचा जन्म होऊन ६३ वर्षे पुरी होत आहेत. मराठ्यांच्या पराक्रमाचा इतिहास शेकडो वर्षांचा असला आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी जगातील एक अन्यन असे मराठी माणसांचे हिंदवी स्वराज्य स्थापन केले असले तरी; इतका मोठा सलग भूभाग एक मे १९६० रोजी प्रथमच एका छत्रछायेखाली आला. ही ऐतिहासिक घटना होती. ती आपोआप साकारली नाही. संयुक्त महाराष्ट्राचा सूर्योदय होण्यासाठी हजारो मराठ्यांनी आपले रक्त सांडले. छातीवर लाठ्या, गोळ्या झेलल्या. दिल्लीश्वरांच्या क्रोधाची तमा केली नाही. महाराष्ट्र तशी ती कधीच करीत नसे. हे मराठी राज्य झाले तरी आपली बेळगाव, कारवार आदी सीमाभागातील भावंडे दूरच राहिली. सहा दशकांचा प्रवास करून महाराष्ट्र आज या मुक्कामावर आला असला तरी तो शांत, समाधानी, विचारी आणि भविष्याबाबत निश्चिंत नाही. उलट, आजचा महाराष्ट्र अनंत समस्यांनी, प्रश्नांनी, संकटांनी कातावलेला व धास्तावलेला आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीला आणि विकासाला कोणतीही स्पष्ट दिशा नाही. सर्व समाजाला मान्य असा समान कार्यक्रम नाही. नाही तर, प्रकल्पांवरून आंदोलने झाली असती का? राजकीय नेत्यांचे आणि पक्षांचे अध:पतन तर अशा वेगाने होते आहे की विचारी जनांना त्यांची शिसारी येते. त्यांच्याबद्दल घृणा वाटते. मग ते विचारी जन समाजापासून अधिकच तुटतात. हा त्यांचा आणि समाजाचा तोटाच असतो. भारतीय स्वातंत्र्याची शताब्दी होईल, तेव्हा भारताचा जीडीपी २६ लाख कोटी डॉलर इतका प्रचंड असावा, असे स्वप्न आहे. ते कदाचित आधीही पुरे होईल. यात सर्वाधिक वाटा असेल तो महाराष्ट्राचा.

एकेक आघाडी पाहूया. औद्योगिक विकासात महाराष्ट्र पहिला असला तरी विकासाचे केवळ पुंजके आहेत. ते मुंबई-पुणे-नाशिक हा त्रिकोण आणि औरंगाबाद तसेच नागपूर व त्यांचा परिसर इतक्याच प्रदेशात आहेत. हे चित्र आजही तसेच आहे.

# निसर्गाची साद






**सुहाना सफर और ये मौसम हसीं**
**हमें डर है हम खो न जाए कही**
**सुहाना सफर और ये मौसम हसीं**
**ये कौन हँसता है फूलों में छुप कर**
**बहार बेचैन है किसकी धून पर**
**कही रुनझुन कही गुनगुन के**
**जैसे नाचे जमीं**
**सुहाना सफर और ये मौसम हसीं ।।**

हे गाणे भैरवी रागातील. कारण यात सर्व स्वर कोमल लागतात. काही स्वर मात्र शुद्ध लावले आहेत. भैरवीत काही शुद्ध सूर रंजकतेसाठी लावले तरी चालतात. सिनेसंगीतात रागाच्या चौकटी विशेष पाळल्या जात नाहीत. रंजकता व शब्द यांना महत्त्व असते. खरंतर काव्यातच चाल लपलेली असते, ती ज्या संगीतकाराला दिसते, तो संगीतकार यशस्वी होतो. मला वाटतं, आपले सर्वच संगीतकार याबाबतीत यशस्वी म्हणावे लागतील. 'ये आसमा झुक रहा है जमीं पर' याची चालसुद्धा अवरोही (स्वरावली खाली येणे) केली आहे. स्वरांच्या आकाशाला थोडं खाली झुकवलं आहे. यातील सर्वच अंतऱ्यांची चाल ही अवरोही बेतलेली आहे. कारण हे गाणं म्हणजे स्वतःचा स्वतःशी केलेला सुखद संवाद आहे. निसर्गसौंदर्य पाहून अत्यंत आनंदी झालेल्या मनाचा हा सांगीतिक उन्मुक्त आविष्कार आहे.

दिलीपकुमार यांच्या सहजसुंदर अभिनयाने स्मरणीय झालेल्या 'मधुमती' या चित्रपटातील हे गाणं संगीतबद्ध केलं आहे सलिल चौधरी यांनी, तर लिहिलंय शैलेंद्र यांनी व मुकेश यांनी ते गायलं आहे.

निसर्ग आणि माणूस यांतील अतूट नातं अधोरेखित करणारं असं हे गीत आहे. निसर्ग आणि माणूस हे वेगवेगळे असू शकतच नाहीत. कारण जे निसर्गात आहे, ते माणसाच्या शरीरातसुद्धा भरलेलं आहे. माणसाचं शरीरसुद्धा पंचमहाभूतांनी बनलेलं आहे, त्यामुळे माणूस हा नेहमी निसर्गाच्या सान्निध्यात राहिला तर नक्कीच निरोगी राहील असं मला वाटतं. आज परिस्थिती खूपच बदलली आहे. कार्यमग्नतेमुळे माणसाला चंद्र, सूर्य, चांदणं यांचं दर्शन अप्राप्य झालं आहे. त्याचप्रमाणे मोकळा वारा, हिरवाई, पाण्याचा मंजूळ नाद हेसुद्धा अनुभवायला मिळेलच असं नाही. माणूस त्याच्या रोजच्या धकाधकीच्या जीवनात इतका गढून गेलेला आहे की, निसर्ग त्याच्यापासून रोज दूर दूर जात आहे.

आज आपण पर्यावरण या विषयावर भरपूर बोलत असतो; परंतु यावर आपण किती जण गंभीरपणे विचार करतो हे पाहण्याजोगं आहे. आपल्याला आज शुद्ध हवा मिळते का याचा प्रत्येकाने विचार करायला हवा. आज धूर, धूळ, अनेक प्रकारचे रासायनिक घटक यामुळे आपली हवा अशुद्ध होत आहे आणि ती आपल्या श्वासावाटे आपल्या शरीरात संक्रमित होत आहे. म्हणूनच आजकाल शनिवार, रविवार म्हणजेच आठवड्याचे दोन शेवटचे सुटीचे दिवस बरेचसे लोक निसर्गरम्य ठिकाणी जात असतात.

परंतु, एवढ्या उपायाने आपलं जीवन सुधारणार आहे का, याचा प्रत्येकाने विचार करणं आवश्यक आहे. आज हवामानात असंख्य बदल होत आहेत. पूर्वी नेमेचि येतो मग पावसाळा, हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा' असं आपले वडीलधारे आपल्याला शिकवत असत; परंतु ती परिस्थिती आज राहिली नाही. आज निसर्गातील प्रत्येक घटक लहरी झाला आहे. आजकाल हिवाळ्यातसुद्धा पाऊस बरसत असतो आणि उन्हाळ्यातसुद्धा थंडी वाजत असते. नद्या कोरड्या पडत चालल्या आहेत.निसर्गाचा समतोल हा केवळ माणसाच्या निसर्गावरील आक्रमणाने बिघडलेला आहे.

**भूगर्भातील उष्णता आणि पावसाचे मुरणारे पाणी, दोन्ही आपल्याला शाश्वत ऊर्जा पुरवू शकेल. म्हणून या स्रोताचे महत्त्व आहे.**

# पर्यावरणस्नेही ऊर्जा

लडाख हा निसर्गसौंदर्याने नटलेला प्रांत. पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील. पूर्वीपासून तिथली जीवनशैली निसर्गाशी समतोल साधत राहण्याची आहे. वर्षातील तीनशेहून अधिक दिवस तिथे भरपूर सूर्यप्रकाश असतो. स्वच्छ हवा, धूळ नाही आणि प्रदेश बराचसा मोकळा असल्याने लडाखमध्ये सौर ऊर्जा सहज मिळवता येते. लडाखमध्ये लोकसंख्या विरळ आहे, त्यामुळे वीजपुरवठ्याचे जाळे उभारणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत दुर्गम भागात सौर ऊर्जेने गरज भागवता येते.

याच सोबत, लडाखमध्ये इतर पर्यावरणस्नेही ऊर्जास्रोतांचा वापर होतो. त्यात छोटे छोटे जलविद्युत प्रकल्प जवळच्या प्रदेशाला वीज पुरवतात. लेह परिसरात सौर आणि पवनऊर्जेचे हायब्रिड प्रकल्प आहेत. लडाखमध्ये एक लाख मेगावॉट इतकी पवनऊर्जा आपण मिळवू शकतो, असा एका पाहणीचा निष्कर्ष आहे आणि पवनऊर्जा फार्म्स उभारण्याच्या योजना आहेत. त्याव्यतिरिक्त सौर ऊर्जेच्या वापराने पाण्यातून हायड्रोजन वेगळा करता येईल का आणि तो हायड्रोजन वाहनांसाठी वापरता येईल का, या दिशेने लडाखमध्ये प्रयत्न सुरू आहेत.



या अपारंपरिक स्रोतांमध्ये आणखी एक महत्त्वाचा स्रोत आहे भूऔष्णिक म्हणजे जिओथर्मल ऊर्जा. पृथ्वीच्या पोटातील उष्णतेने सतत गरम राहणारे झरे लडाखमध्ये अनेक जागी आहेत. स्थानिक लोक हे गरम पाणी वापरतात. आता त्यापासून वीज उत्पादन करण्याचा विचार होत आहे. लडाखमधल्या पुगा खोऱ्यात असे खूप झरे आहेत. याचा फायदा घेत या खोऱ्यात एक भूऔष्णिक ऊर्जा केंद्र सुरू होत आहे. सुमारे एक मेगावॅट इतकी वीज त्यातून मिळवता येईल आणि ती दोनशे घरांना पुरेशी होईल. वीजनिर्मितीसाठी गरम पाण्याच्या झऱ्यांचा उपयोग करण्यात आइसलँड हा देश आघाडीवर आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 'वज्रमूठ' सभेतून सरकारवर हल्लाबोल!

## एकनाथ शिंदेंना त्यांची जागा दाखवायची वेळ आलीयः अजित पवार

।मुंबई । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी 'वज्रमूठ' सभेतून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. या सभेतून अजित पवारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आता जागा दाखवून द्यायची वेळ आली आहे, असं विधान केलं आहे. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्या विविध चुकांचा पाढा वाचला आहे.**

'वज्रमूठ' सभेत भाषण करताना अजित पवार म्हणाले, "सर्वोच्च न्यायालयाने शिंदे-फडणवीस सरकारला नपूंसक म्हटलं आहे, याची यांना जनाची नाही, मनाची लाज वाटत नाही. राज्यात प्रक्षोभक भाषणं होत असताना, दंगली माजवण्याचा प्रयत्न होत असताना ते थांबवण्याची ताकद ज्या सरकारमध्ये नाही ते नपुंसक सरकार आहे, अशी खरडपट्टी सर्वोच्च न्यायालयाने काढली. हा महाराष्ट्राचा अपमान नाही का? हा महाराष्ट्राचा कमीपणा नाही का?"

"आपण सर्वजण महाराष्ट्रीयन आहोत. आपलीही अशा गोष्टींमुळे शरमेने मान खाली जाते. परंतू नैतिकदृष्ट्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना याबद्दल काहीही वाटत नाही. मुख्यमंत्री अलीकडे अनेकदा चुकलेले मी पाहिलं आहे, तुम्हीही पाहिलं असेल. मागे म्हणाले की, देशाचे पंतप्रधान द्रौपदी मुर्मू. आता द्रौपदी मुर्मू देशाच्या पंतप्रधान आहेत की राष्ट्रपती हेही यांना माहिती नाही." अशी टीका अजित पवारांनी एकनाथ शिंदेंवर केली. "काल की परवाच काही उद्योगपतींसमोर भाषण सुरू होतं. तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आम्ही मुंबईत 'साडेतीनशे पन्नास' किमी मेट्रोलाईन टाकली. आता कशाला साडेतीनशे पन्नास म्हणतात कुणाला माहीत... ते राज्याच्या १३-१४ कोटी जनतेचे प्रमुख आहेत. जर त्यांना जमत नसेल तर त्यांनी नोट काढावी आणि ती नोट वाचावी. काही बिघडत नाही. मात्र, साडेतीनशे पन्नास कोटी कशाला म्हणतात? याचं उत्तर शोधताना गणिताचे विद्यार्थी तर तोंडात बोटच घालतील."




### वज्रमूठ सभेतील प्रकाराची कार्यकर्त्यांमध्ये कुजबुज

महाविकास आघाडीच्या वज्रमूठ सभेत आधी साधा पोडियम पाहायला मिळाला. या साध्या पोडियमवरून आदित्य ठाकरे, संजय राऊत, भाई जगताप, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाषणं केली. पण त्यानंतर फुलांनी सजवलेला एक वेगळा पोडियम व्यासपीठाच्या मध्यभागी ठेवण्यात आला. यावेळी त्यावर अजित पवार यांनी आक्षेप घेतला. त्यानंतर आदित्य ठाकरे आणि मिलिंद नार्वेकर यांनी त्यांची समजूत घातली. सभेच्या व्यासपीठावरच जवळपास पाच ते दहा मिनिटे पोडियमवरून कुजबूज सुरू होती.

### ठाकरेंच्या भाषणाची सुरवातच हिंदू बंधु-भगिनी आणि मातांनो; काँग्रेस-राष्ट्रवादीला हे चालणार का?

आदित्य ठाकरे आणि मिलिंद नार्वेकर यांनी अजित पवारांची समजूत घातल्यानंतर ते वेगळ्या पोडियमसाठी तयार झाले.

त्यानंतर फुलांनी सजवलेल्या पोडियमवरून माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भाषणं झाली.

मात्र, शेवटच्या तीन भाषणालाच फक्त फुलांनी सजवलेला पोडियम का? असा सवाल आता राजकीय वर्तुळात उपस्थित करण्यात येत आहे.

### "त्यांना त्यांची जागा दाखवण्याची वेळ आली आहे"

**"एकनाथ शिंदेंनी मागे एमपीएससी आणि निवडणूक आयोगातही घोटाळा करून टाकला होता. ते घोटाळा करूनच मुख्यमंत्री झाले आहेत. त्यामुळे घोटाळा आणि मुख्यमंत्र्यांचं वक्तव्य हे काही सुटायला तयार नाही. आता त्यांना त्यांची जागा दाखवण्याची वेळ आली आहे," असंही अजित पवारांनी नमूद केलं.**

### जनताच अमित शाहांना जमीन दाखवेल

**दरम्यान, याआधी छत्रपती संभाजीनगरच्या सभेत उद्धव ठाकरे यांच्यासाठी वेगळी खुर्ची ठेवण्यात आली होती. त्यामुळे फक्त उद्धव ठाकरे यांच्यासाठीच वेगळी खुर्ची का? अशी चर्चा झाली होती. त्यानंतर काही नेत्यांनी यावर स्पष्टीकरणही दिलं होतं.आता मुंबईतील बीकेसी मैदानात झालेल्या सभेत दोन वेगवेगळ्या पोडियमवरून कुजबूज झाल्याची चर्चा आहे. तसेच यावर अजित पवारांनी आक्षेप घेतल्याचंही बोललं जात आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत पुन्हा एकदा मतभेद झालेत का? अशी चर्चा सुरू झाली आहे.**

---

# "तुझे डोळे चिनी आहेत चिनी, असे बारीक डोळे!

## संजय राऊतांचा आशिष शेलार यांच्यावर हल्लाबोल

। मुंबई। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

शिवसेनेचे खासदार (ठाकरे गट) संजय राऊत यांनी मुंबईतील वज्रमुठ सभेवर टीका करणाऱ्या मुंबई भाजपा अध्यक्ष आशिष शेलार यांच्यावर सडकून टीका केली आहे. "आम्ही त्यांना सांगू इच्छितो की, तुझे डोळे चिनी आहेत चिनी," असं म्हणत संजय राऊतांनी भाजपा नेते आशिष शेलारांवर शाब्दिक हल्ला चढवला. ते सोमवारी (१ मे) मुंबईत बीकेसी मैदानावर आयोजित वज्रमुठ सभेत बोलत होते. संजय राऊत म्हणाले, "आज महाराष्ट्र दिन आहे आणि महाराष्ट्राला प्रणाम करण्यासाठी ही वज्रमुठ सभा आहे. सभा प्रचंड आहे. जेवढी सभा इथं गच्च भरली आहे, त्यापेक्षा दुप्पट-तिप्पट लोक संपूर्ण बीकेसीच्या अवतीभोवती उभे आहेत. आज सकाळीच मी ऐकत होतो. भाजपाचे मुंबईतील एक नेते सांगत होते की, मुंबईतील सर्वात लहान मैदानावर ही सर्वात लहान वज्रमुठ सभा होते आहे. आम्ही त्यांना सांगू इच्छितो की, तुझे डोळे चिनी आहेत चिनी. त्यांचे डोळे असे बारीक आहेत."

"अरे येऊन पाहा ही काय ताकद आहे. या सभेने एक निकाल दिला आहे. मुंबई महाराष्ट्राची, मराठी माणसाची, मुंबई आमच्या बापाची. काल देशाचे गृहमंत्री मुंबईत आले होते. आत्ता आहेत की नाहीत, मला माहिती नाही. बहुतेक वज्रमुठ सभा पाहायला सभेत येऊन बसले असतील. त्यांनी ही ताकद पाहावी. ही निष्ठा पाहावी आणि आमची वज्रमुठही पाहावी," असं आव्हान संजय राऊतांनी दिलं.



### "देशाचा एकमेव पंतप्रधान पाहिला जो ९ वर्षे फक्त मन की बात करत आहे"

संजय राऊत पुढे म्हणाले, "या देशात काल आणखी एक इव्हेंट झाला. तो म्हणजे मन की बात. मन की बात काय असतं, तर अभिनेत्री माधुरी दिक्षित कुठंतरी गर्दीत ऐकते आहे. मी या देशाचा एकमेव पंतप्रधान पाहिला जो ९ वर्षे फक्त मन की बात करत आहे, काम की बात करत नाही. अरे काम की बात करा, जनतेची बात करा. महाराष्ट्राची ही वज्रमुठ सभा यापुढे केवळ काम की बात करेल."

### "महाराष्ट्राचे लचके तोडण्याचं कारस्थान सुरू"

**आज महाराष्ट्राची परिस्थिती काय आहे. पुन्हा एकदा दिल्लीच्या पातळीवर महाराष्ट्राचे लचके तोडण्याचं कारस्थान सुरू झालं आहे. मुंबई महाराष्ट्रापासून तोडायची, कमजोर करण्याचं षडयंत्र रचलं जात आहे. त्यासाठीच शिवसेनेवर हल्ला केला गेला, घाव घातला. जोपर्यंत या महाराष्ट्रात शिवसेना मजबूत आहे तोपर्यंत आपल्याला या महाराष्ट्राचा लचका तोडता येणार नाही ही भीती दिल्लीश्वरांना होती. म्हणून त्यांनी शिवसेनेचा लचकातोड करण्याचा प्रयत्न केला," असा आरोप संजय राऊतांनी केला.**

### "शिवसेना मुंबई-महाराष्ट्रात पाय रोऊन उभी राहील"

**"असं असलं तरी त्यांनी कितीही लांडगेतोड केली, तरी ही शिवसेना मुंबई-महाराष्ट्रात पाय रोऊन उभी राहील आणि त्यांचे लचके तोडल्याशिवाय राहणार नाही. कारण आता शिवसेनेबरोबर आता काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, मुस्लीम समाज, दलित बांधव आहेत," असंही राऊतांनी नमूद केलं.**

# ...तर जिवाचीही पर्वा करणार नाही"!

## जंतरमंतरवरच्या कुस्तीगीरांना नवजोत सिद्धूंचा पाठिंबा



**।नवी दिल्ली महाईन्यूज।**

**भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांच्याविरोधात मागच्या नऊ दिवसांपासून महिला कुस्तीगीर हे दिल्लीतल्या जंतरमंतर या ठिकाणी आंदोलन करत आहेत. त्यांना पुरुष मल्लांची साथ लाभली आहे. बृजभूषण सिंह यांच्यावर लैंगिक छळाचा ठपका या सगळ्यांनी ठेवला आहे. तसंच त्यांची हकालपट्टी करण्यात यावी अशीही मागणी या सगळ्यांनी केली आहे. या सगळ्या मल्लांना देशभरातून पाठिंबा मिळतो आहे. नुकतीच प्रियंका गांधींनी त्यांची भेट घेतली होती. त्यापाठोपाठ आज काँग्रेस नेते नवजोत सिंग सिद्धू यांनीही या कुस्तीगीर आंदोलकांची भेट घेतली.**

### काय म्हटलं आहे सिद्धू यांनी?

तुम्हाला जर न्याय मिळाला उशीर झाला तर मी माझ्या प्राणांची बाजीही लावेन असं म्हणत नवजोत सिंग सिद्धू यांनी कुस्तीगीरांना आपला पाठिंबा जाहीर केला आहे. जर सत्य काय आहे ते जाणून घ्यायचं असेल तर कस्टोडियल इनव्हेस्टिगेशन आवश्यक आहे. जर असं झालं नाही तर काय अर्थ आहे? कायदा सगळ्यांसाठी सारखा आहे मग असं करून आपण समाजात प्रतिष्ठा असलेल्या व्यक्तींना काही वेगळा नियम लावणार का? असाही प्रश्न सिद्धू यांनी विचारला आहे. सर्वात आधी तर बृजभूषण सिंह यांनी राजीनामा द्यायला हवा असंही सिद्धू यांनी म्हटलं आहे. आपण या आंदोलनात सहभागी होणार हे सिद्धू यांनी ट्वीट करुनही सांगितलं होतं.

कुस्तीगीर महिला आरोप करत आहेत तरीही या प्रकरणात अद्याप FIR करायला विलंब का लागला? तसंच ही एफआयआर सार्वजनिकही करण्यात आली नाही. बृजभूषण सिंह यांना नेमकं का वाचवलं जातं आहे? असेही प्रश्न सिद्धू यांनी त्यांच्या ट्वीटमध्ये विचारले आहेत.

अखिल भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्या विरोधात महिला कुस्तीगिरांनी लैंगिक शोषणाचा आरोप केला आहे. या प्रकरणात ब्रिजभूषण यांच्याविरोधात दोन गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत. मागच्या ९ दिवसांपासून महिला कुस्तीगीर आंदोलन करत आहेत. न्याय मिळावा अशी अपेक्षा त्यांनी केली आहे.

# "२०२४ मध्ये फिर एक बार, मोदी सरकार"

आगामी लोकसभा निवडणुकीबाबत बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री कंगना रणौतचा मोठा दावा



**।नवी दिल्ली। महाईन्यूज।**

आगामी लोकसभा निवडणुकीकरता सर्वच पातळ्यांवर जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे. सर्वच पक्षांकडून मोर्चेबांधणी सुरू झाली असून सत्ताधारी पक्षाने ३०० पेक्षा अधिक जागांचं टार्गेटही ठरवले आहे. पुढच्या निवडणुकीत सत्तांतर होणार की, मोदी सरकारच सत्तेवर राहणार यावर चर्चा रंगू लागल्या आहेत. दरम्यान, बॉलिवूडची प्रसिद्ध अभिनेत्री कंगना रणौतनेही आगामी लोकसभा निवडणुकीबाबत मोठा दावा केला आहे.

"निवडणुकीबाबत लोकांमध्ये फारच उत्सुकता आहे. पण २०२४ मध्ये तेच घडणार आहे जे २०१९ मध्ये घडलं आहे", असं कंगना रणौत म्हणाली. आगामी 'इमजरन्सी' या चित्रपटाच्या कामात व्यस्त असलेली कंगना रविवारी हरिद्वारला गेली होती. तिथे तिने गंगा आरतीही केली. त्यानंतर तिने माध्यमांना ही प्रतिक्रिया दिली.

२०१९ च्या निवडणुकीनंतर कंगनाने देशाच्या राजकारणावर सातत्याने भूमिका घेतली आहे. देशपातळीवर घडणाऱ्या अनेक घडामोडींवर ती व्यक्त होत असते. त्यामुळे ती आगामी निवडणूक लढवणार असल्याची चर्चाही सुरू आहे.

तमिळ राजकारणी जयललिता यांच्या जीवनावर आधारित बायोपिक 'थलाइवी' सप्टेंबर २०२१ मध्ये प्रदर्शित करण्यात आला होता. या चित्रपटात कंगना रणौतने महत्त्वाची भूमिका निभावली होती. या चित्रपटाच्या प्रमोशनदरम्यान, "माझ्या चाहत्यांची इच्छा असेल तर मला राजकारणात उतरायला आवडेल", असं ती म्हणाली होती.

### इंदिरा गांधी यांच्या मुख्य भूमिकेत कंगना...

कंगना सध्या 'इमरजन्सी' चित्रपटाच्या कामात व्यस्त आहे. तिने दिग्दर्शित केलेला हा तिचा पहिलाच चित्रपट आहे. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जीवनावर आधारित हा चित्रपट असून यामध्ये इंदिरा गांधी यांच्या मुख्य भूमिकेत कंगना रणौत दिसणार आहे.

# व्यावसायिक एलपीजीच्या दरांमध्ये मोठी कपात

## व्यावसायिक वापरासाठी सिलिंडर झाले 171 रुपयांनी स्वस्त!

**।नवी दिल्ली। महाईन्यूज। प्रतिनिधी।**

**गेल्या काही महिन्यांमध्ये एलपीजी सिलेंडरच्या दरांमुळे ग्राहक वर्गाची चिंता वाढवली होती. या चिंतेमध्ये इतर जीवनावश्यक गोष्टींसह सर्वच गोष्टींची महागाई हाही लोकांसाठी चिंतेचा विषय झाला होता. या सर्व पार्श्वभूमीवर आज सरकारने व्यावसायिक वापरासाठीच्या सिलिंडर्सच्या किमतीमध्ये मोठी कपात करण्याची घोषणा केली आहे. ही दरकपात १९ किलोच्या व्यावसायिक वापराच्या सिलिंडर्ससाठी लागू असेल. सरकारने दरांचा आढावा घेतल्यानंतर सिलिंडरच्या दरांमध्ये तब्बल १७१.५० रुपयांची कपात जाहीर केली आहे. यामुळे व्यावसायिक वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, त्याचवेळी घरगुती सिलिंडर्सच्या दरात कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत.**

ऑईल मार्केटिंग कंपन्या अर्थात OMC नी मार्च महिन्यात १९ किलोच्या सिलिंडर्सची किंमत तब्बल ३५०.५० रुपयांनी वाढवली होती, तर घरगुती वापराच्या सिलिंडर्सच्या किमतीत ५० रुपयांची वाढ केली होती. त्यानंतर ही पहिली दरकपात करण्यात आली आहे.



### कधीपासून लागू झाली दरकपात?

**» जाहीर करण्यात आलेल्या माहितीनुसार, १ मे अर्थात आजपासूनच ही दरकपात लागू होणार आहे. त्यामुळे दिल्लीमध्ये दरकपातीनंतर सिलिंडर आता १८५६.५० रुपयांना उपलब्ध होणार आहे. त्याचवेळी मुंबईत हे दर १८०८.५० रुपये इतके असतील, तर कोलकातामध्ये १९६०.५० रुपयांना व्यावसायिक वापराचे सिलिंडर उपलब्ध होणार आहेत. दरकपातीआधी या शहरांमध्ये सिलिंडर्सच्या किमती अनुक्रमे २०२८ रुपये, १९८० रुपये आणि २१३२ रुपये इतक्या होत्या.**

# कर्नाटक निवडणुकीत भाजपला ४० जागांवर रोखा!

**बंगळूर** - कर्नाटकात '४० टक्के भ्रष्टाचारा'त गुंतलेल्या भाजपला केवळ ४० जागा मिळतील. याची खात्री भाजपने करून घ्यावी. तर काँग्रेसला किमान १५० जागा मिळतील. ते (भाजप) आमदार विकत घेणार नाहीत आणि लोकशाही पद्धतीने निवडून आलेले सरकार पाडणार नाहीत, अशी



आपण आशा करुया, असा टोला काँग्रेस नेते राहुल गांधी मारला. तुमकूर जिल्ह्यात जाहीरसभेला ते मार्गदर्शन करत होते.

पंतप्रधानांना ९१ वेळा शिवीगाळ करण्यात आली, या आरोपावरून सोमवारी राहुल गांधी म्हणाले, 'पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हे समजून घेतले पाहिजे की, कर्नाटक निवडणूक त्यांच्यासाठी नाही. स्वत:बद्दल बोलण्याऐवजी पंतप्रधानांना कर्नाटकातील भाजप सरकारच्या कामाबद्दल बोलावे. तुम्ही (मोदी) कर्नाटकात निवडणुकीच्या प्रचारासाठी येता, पण कर्नाटकबद्दल बोलत नाही. तुम्ही तुमच्याबद्दल बोलता. तुम्ही तीन वर्षांत कर्नाटकात काय केले, ते तुम्हाला सांगावे लागेल. तुमच्या भाषणातही तुम्हाला बोलायचे आहे. पुढच्या पाच वर्षात तुम्ही काय करणार आहात?

# बैलगाडा शर्यतींचा थरार मोठ्या पडद्यावर अवतरणार

महाराष्ट्राच्या सामाजिक राजकीय वातावरणात बैलगाडा शर्यतींना मोठं महत्त्व आहे. आता याच बैलगाडा शर्यतींचा जल्लोष चित्रपटात उडताना पाहायला मिळणार आहे. राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त दिग्दर्शक मकरंद माने यांच्या खिल्लार या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. या चित्रपटात बैलगाडा शर्यत आणि त्याभोवतीचे वातावरण दाखवले जाणार आहे. यात अभिनेत्री रिंकू राजगुरू आणि ललित प्रभाकर प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत.

रिंकू राजगुरुने नुकतंच इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने 'खिल्लार' या चित्रपटाचे पोस्टर शेअर केले आहे. या पोस्टरमध्ये दोन बैल शर्यतीत धावताना दिसत आहे. यावर चित्रपटाचे नाव पाहायला मिळत आहे. येत्या काही दिवसांत चित्रपटाचं चित्रीकरण सुरू होणार आहे. चित्रपटाची कथा, कलाकार आदी तपशील टप्प्याटप्प्याने जाहीर करण्यात येणार आहे. महाराष्ट्र दिनाच्या सगळ्यांना "खिल्लार" शुभेच्छा. भिर्रर्रर्र... महाराष्ट्राच्या मातीतला अस्सल रांगडा खेळ ... बैलगाडा शर्यत यावर लेखक-दिग्दर्शक मकरंद शशिमधु माने यांनी खिल्लार या मराठी चित्रपटाची घोषणा केली आहे. या सिनेमाचा आम्ही भाग आहोत याचा आम्हाला आनंद आहे, असे रिंकू राजगुरुने म्हटले आहे.



न्युक्लिअर ॲरो पिक्चर्स या निर्मिती संस्थेतर्फे 'खिल्लार' या चित्रपटाची निर्मिती करण्यात येत आहे. तर मकरंद माने हे या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. मूळचा पश्चिम महाराष्ट्रातला असल्यानं मकरंदनं बैलगाडा शर्यतींचं वातावरण अतिशय जवळून पाहिलं आहे. त्यामुळेच आता हा विषय तो 'खिल्लार' चित्रपटातून मांडत आहे.




या चित्रपटात अभिनेत्री रिंकू राजगुरू आणि ललित प्रभाकर प्रमुख भूमिकेत झळकणार आहेत. हा चित्रपट २०२४ ला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# 'तेंडल्या' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित

भारतीय रसिकांमध्ये क्रिकेटचे वेड काहीही केलं तरी कमी होत नाही. चाहते हे आपल्या लाडक्या क्रिकेटपटूसाठी काय करतील याचा काही नेम नाही. त्यातही मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरची गोष्ट काही औरच... 'अश्वमेध मोशन पिक्चर्स' निर्मित 'तेंडल्या' या मराठी चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे.

'तेंडल्या' या चित्रपटाच्या ट्रेलरची सुरुवात लहान मुलगा बॅट घेण्यासाठी हट्ट करताना दिसत आहे. "मला कंपास वैगरे काय नको, मला बॅट हवी", असे तो सांगतो. त्यानंतर त्याची आई त्याला धपाटे देते. यानंतर भारत-पाकिस्तान सामना पाहण्यासाठी सुरु असलेली धावपळ, लहान मुलांची भारताच्या टीममध्ये जागा मिळवण्यासाठीचा सराव आणि घरात टिव्हीवर सामना पाहता यावा यासाठीची धडपड यात दिसत आहे.'तेंडल्या' या चित्रपटाची कथा ही खेड्यापाड्यात राहणाऱ्या लोकांचं सचिन तेंडुलकरवर असणारं प्रेम आणि क्रिकेट यावर अवलंबून आहे. या चित्रपटाला पाच राज्य आणि एक राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. या चित्रपटाची निर्मिती करोना काळापूर्वी झाली होती. २४ एप्रिल २०२० रोजी महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरच्या वाढदिवशी हा चित्रपट प्रदर्शित होणार होता. मात्र करोनामुळे या चित्रपटाचे प्रदर्शन रखडलं.

येत्या ५ मे रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात झळकणारे कलाकार शूटिंगच्या वेळी ११ वी आणि १२ वी पर्यंत शिक्षण घेत होते. यात ओंकार गायकवाड, स्वप्नील पाडळकर, राज कोळी, हर्षद केसरे, महेश जाधव, आकाश तिकोटी हे कलाकार दिसणार आहे.




# वैवाहिक जीवनातील समस्यांवरील सांगीतिक मलमपट्टी

मध्यवर्ती पात्रांच्या वैवाहिक जीवनातील समस्या, घटस्फोटाची टांगती तलवार, त्याला लागून येणारी न्यायालयातील दृश्यं म्हटलं, की तुमच्या डोळ्यांसमोर कुठलं चित्र उभं राहतं? चित्रपटांचे संदर्भ द्यायचे झाल्यास 'क्रेमर व्हर्सेस क्रेमर' (१९७९), 'अ सेपरेशन' (२०११), 'मॅरेज स्टोरी' (२०१९), इ. बऱ्यापैकी गंभीर आशय व मांडणी असलेले चित्रपट आठवण्याची शक्यता अधिक आहे; पण अशा गंभीर संकल्पना घेऊन एक मजेशीर सांगीतिका बनवली जाऊ शकते, असा विचार तुम्ही केला आहे का? आज आपण ज्या चित्रपटाविषयी बोलणार आहोत, तो चित्रपट अशाच प्रकारचा आहे.




ॲना (झोई लिस्टर-जोन्स) आणि बेन (ॲडम पॉली) हे एक अमेरिकन जोडपं आहे. दोघंही वयाच्या तिशीत आहेत आणि त्यांची एकेकाळची स्वप्नं एव्हाना धुळीस मिळाली आहेत. दोघांचंही व्यावसायिक जीवन खूप मोठं अपयश ठरलं आहे. लेखिका असलेली ॲना चित्रपट सुरू होतो, तेव्हा उबर ड्रायव्हर म्हणून काम करत असते, तर व्हिज्युअल आर्टिस्ट असलेला बेन घरून काम करण्याचं सोंग घेत रिकामटेकडा बसलेला असतो. त्यांच्या वैवाहिक जीवनाचीही अशीच परिस्थिती असते. अशात हे दोघंही कलात्मक प्रेरणांच्या शोधात असतात. मात्र, दोघांचा बहुतांशी वेळ एकमेकांना शिव्या घालण्यात व भांडण्यात जात असतो. त्यांच्या भूतकाळातील चुका त्यांच्या मानगुटीवर स्वार होऊन त्यांच्या वर्तमानातील सुखात व्यत्यय आणत असतात.

# वयाच्या चाळिशीतही फिट कसा?

बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूर शेवटचा 'तू झुठी मैं मक्कार'मध्ये दिसला होता. या चित्रपटात अभिनेता पहिल्यांदाच अभिनेत्री श्रद्धा कपूरसोबत पडद्यावर रोमान्स करताना दिसला होता. हा चित्रपट ८ मार्च रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता. रणबीर आणि श्रद्धा स्टारर चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त व्यवसाय केला. त्याच्या चित्रपटांव्यतिरिक्त, अभिनेता त्याच्या वैयक्तिक आयुष्यासाठी देखील नेहमीच चर्चेत असतो. अलीकडेच, एका मीडिया संवादादरम्यान, त्याने त्याच्या स्किन रूटीन आणि फिटनेसबद्दल खुलेपणाने सांगितले. रणबीर म्हणाला की टॅनिंग टाळण्यासाठी अभिनेता आपला चेहरा बर्फाच्या पाण्यात बुडवून ठेवतो.



अभिनेता पुढे म्हणाला की त्याची पत्नी आणि बॉलिवूड अभिनेत्री आलिया भट्ट त्याच्या फिटनेसची खूप काळजी घेते. याबद्दल बोलताना अभिनेत्याने खुलासा केला की, 'आजकाल आलिया मला योगा करण्यासाठी खूप प्रवृत्त करत आहे. ती म्हणाली ते तुमच्या त्वचेवर दिसते, हे कसे होते ते मला माहित नाही, पण तसे होते.'

14 एप्रिल रोजी रणबीर कपूर आणि आलिया भट्ट यांनी त्यांच्या लग्नाचा पहिला वाढदिवस साजरा केला. दोघांनी 2022 मध्ये लग्न केले होते. शिवाय, या जोडप्याने त्यांची मुलगी राहा हिचे स्वागत केले आहे. दोघेही राहाबाबत खूप प्रोटेक्टिव आहेत.

कामाबद्दल बोलायचे झाले तर, अभिनेता शेवटचा 'तू झूठा मैं मक्कार' मध्ये दिसला होता. याशिवाय रणबीर संदीप रेड्डी वंगा यांच्या 'ॲनिमल' चित्रपटाचाही एक भाग आहे.

# लखनऊ सुपर जायंट्सचे लोटांगण!

## » बंगळुरूच्या गोलंदाजांपुढे आरसीबीचा 18 धावांनी रोमांचक विजय

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३च्या ४३व्या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सचा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी संपन्न झाला. लखनऊच्या एकना स्टेडियमवर झालेल्या सामन्यात बंगळुरूने १८ धावांनी लखनऊवर रोमांचक विजय संपादन केला.**

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना बंगळुरूने २० षटकांत ९ गडी गमावून १२६ धावा केल्या. लखनऊचा संघ २० षटकांत नऊ गडी गमावून १०८ धावाच करू शकला. त्यामुळे आता आयपीएलमध्ये आणखी चुरस वाढली आहे. गुणतालिकेत आता पाच संघ १० गुणांवर आहेत.

**आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना १२७ धावा केल्या**

आरसीबीचा कर्णधार फाफ डू प्लेसिसने गोलंदाजी खेळपट्टीवर नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. अशा परिस्थितीत आरसीबीने निर्धारित २० षटकांत ९ विकेट्स गमावून १२६ धावा केल्या. विराट कोहली (३१), फाफ डू प्लेसिस (४४) यांनी संघाला ही धावसंख्या गाठण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. दुसरीकडे, लखनौकडून नवीन-उल-हकने सर्वाधिक ३ बळी घेतले. याशिवाय रवी बिश्नोई आणि अमित मिश्रानेही २-२ विकेट्स आपल्या नावावर केल्या. कृष्णप्पा गौतमलाही यश मिळाले. आरसीबीने या मोसमातील सर्वात लहान धावसंख्येचा बचाव केला

आरसीबीने लखनऊ सुपरजायंट्स विरुद्ध आयपीएल २०२३ मधील सर्वात लहान टोटलचा बचाव केला आहे. आरसीबीच्या भयानक गोलंदाजीसमोर लखनौचे फलंदाज पूर्णपणे फ्लॉप झाले. १२७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना तो पूर्ण २० षटकेही खेळू शकला नाही आणि १०८धावांवर ऑलआऊट झाला, त्यामुळे तो सामना १८ धावांनी पराभूत झाला. लखनऊकडून कृष्णप्पा गौतमने सर्वाधिक २३ धावा केल्या. तर जोश हेझलवूड आणि करण शर्मने २-२ विकेट घेतल्या. तर मोहम्मद सिराज, ग्लेन मॅक्सवेल, वानिंदू हसरंगा आणि हर्षल पटेल यांनाही १-१ यश मिळाले.

बंगळुरूचा हा मोसमातील पाचवा विजय ठरला. या विजयामुळे तो गुणतालिकेत पाचव्या स्थानावर पोहोचला आहे. आणि या मोसमात लखनौचा हा चौथा पराभव ठरला. समजावून सांगा की पॉइंट टेबलमध्ये १० गुणांसह पाच संघ आहेत. त्यांच्यातील फरक फक्त नेट रन रेटचा आहे.



# आशिया कप 2023 रद्द?

## » पाकिस्तान हट्टी तर BCCI ने केली मोठा प्लॅन

। नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आशिया चषक 2023 कुठे खेळायचा या वरून जवळपास 7 महिन्यांपासून वाद सुरू आहे. पाकिस्तानला या स्पर्धेचे यजमानपद आहे, परंतु मुंबई हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये राजकीय कोंडी झाली आहे. याचा दाखला देत बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी ऑक्टोबरमध्येच टी-20 विश्वचषक 2022 दरम्यान या स्पर्धेसाठी पाकिस्तान दौरा करण्यास नकार दिला होता. त्यानंतर हा वाद सुरू झाला.**



पीसीबीचे तत्कालीन प्रमुख रमीझ राजा यांनी यावर्षी भारतात होणाऱ्या एकदिवसीय वर्ल्ड कप न खेळण्याची धमकी दिली. कार्यवाहक अध्यक्षाची भूमिका सध्या नजम सेठी करत आहेत. ते आल्यानंतरही हा वाद मिटला नाही. आता ज्या गोष्टी समोर येत आहेत त्यात आशिया कप 2023 रद्द होऊ शकतो अशी चर्चा आहे.

क्रिकेट पाकिस्तान या वेबसाइटने याबाबत संपूर्ण माहिती शेअर केली आहे. पाकिस्तान आपल्या आडमुठेपणावर ठाम आहे. ही स्पर्धाही रद्द होऊ शकते. एवढेच नाही तर आशिया चषक रद्द झाल्यास भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) त्या विंडोमध्ये 5 देशांदरम्यान बहुराष्ट्रीय स्पर्धा आयोजित करण्याचा निर्णयही घेतला असल्याचे त्या अहवालात म्हटले आहे.सध्या हा वाद पाहता बांगलादेश आणि श्रीलंका क्रिकेट बोर्डांनीही पाकिस्तानची समजूत काढण्याचा प्रयत्न केला आणि ही स्पर्धा आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केली. गेल्या वर्षी ही स्पर्धा UAE मध्ये आयोजित करण्यात आली होती. आशिया कप 2023 रद्द होण्याच्या मार्गावर आहे. यासोबतच बीसीसीआयनेही त्या रिकाम्या वेळेत स्पर्धा घेण्याचे नियोजन सुरू केले आहे. या अंतर्गत पाच देशांदरम्यान बहुराष्ट्रीय स्पर्धा होऊ शकतात. पण असे झाल्यास पाकिस्तानच्या विश्वचषक स्पर्धेच्या तयारीलाच धक्का बसणार नाही, तर आंतरराष्ट्रीय आणि क्रिकेटच्या महसुलाच्या दृष्टीनेही त्याचे नुकसान होणार आहे.

# कामगिरी उंचावण्याचे भारतीय बॉक्सिंगपटूंचे उद्दिष्ट

। ताश्कंद (उजबेकिस्तान) ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



पुरुष विभागाच्या जागतिक अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेला सोमवारपासून सुरुवात होत असून, भारतीय बॉक्सिंगपटू या स्पर्धेत आपली कामगिरी उंचावण्याच्या इराद्याने उतरतील. स्पर्धेच्या अखेरच्या पर्वात भारताला केवळ एका कांस्यपदकावर समाधान मानावे लागले होते. स्पर्धेत एकूण सात गतविजेते सहभागी झाले आहेत.

महिला स्पर्धेप्रमाणे या स्पर्धेलाही ऑलिम्पिक पात्रतेचा दर्जा नाही. यानंतरही आशियातील बॉक्सिंगपटू आशियाई क्रीडा स्पर्धेची पूर्वतयारी म्हणून या स्पर्धेकडे बघतील. ऑलिम्पिकसाठी पुरुष गटातही वजन गट बदलण्यात आले आहे. ऑलिम्पिक स्पर्धेत १३ ऐवजी सातच वजनी गटांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये ५१, ५७, ६३.५, ७१, ८०, ९२ आणि ९२ किलोपेक्षा अधिक अशा वजनी गटांचा समावेश आहे. भारताची मदार प्रामुख्याने सहा आशियाई पदकविजेता राहिलेल्या शिवा थापा याच्यावर असेल. शिवा ६३.५ किलो वजन गटातून खेळणार आहे.

याशिवाय २०१९ स्पर्धेत रौप्यपदक मिळवणारा अमित पंघाल आणि गतवर्षीचा कांस्यदक विजेता आकाश कुमार यांच्याही कामगिरीकडे नजरा असतील. शिवाने सहा आशियाई पदके मिळवली असून, २०१५ मध्ये जागतिक स्पर्धेतील कांस्यपदकही त्याच्या नावावर आहे. आता या वेळी पदकाचा रंग बदलण्यासाठी शिवा अधिक उत्सुक असेल.